दिनांक २८.१०.२०२५.

**प्रेसनोट**

१) मनोहर लक्ष्मण खिल्लारी, वय ६० वर्ष, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि. हिंगोली, रा.माऊली नगर, गोरे ले आउट, वाशिम जि. वाशिम व त्यांची पत्नी २) सौ. रेखा मनोहर खिल्लारी वय ५८ वर्षे, व्यवसाय –घरकाम, रा. माऊली नगर, गोरे ले–आउट, वाशिम जि. वाशिम यांचे परिक्षण कालावधीत गैरअर्जदार मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ. रेखा खिल्लारी या दोघांचे मालमत्तेची गणना केली असता त्यांचेकडे अधिकची अपसंपदा निष्पन्न झाल्याने दोघांविरूद्ध पो.स्टे. हिंगोली शहर गुरनं. ८०४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई), १३ (२) अन्वये व दिनांक २६ जुलै २०१८ नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ ( सुधारणा कायदा २०१८) चे कलम १३ (१) (ब) सह कलम १३ (२), कलम १२ सह कलम १०९ भारतीय दंड सहीता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ. रेखा मनोहर खिल्लारी यांचे परिक्षण कालावधी दिनांक ०१.०१.२००५ ते दिनांक १५.०३.२०२२ मध्ये आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ. रेखा मनोहर खिल्लारी या दोघांचा खर्च व एकुण मालमत्ता **१,८७,१५,५२१/–** रुपये यामधुन दोघांचे एकुण उत्पन्न **१,४३,०९,७४६/–** रुपये वजा जाता त्यांच्याकडे **४४,०५,७७५/–** इतकी अधिकची (अपसंपदा) त्यांचे उत्पन्नापेक्षा जास्त निष्पण आहे. त्यांच्या दोघांच्या अपसंपदेची गणना केली असता अपसंपदा ही **+ ३०.७८ टक्के निष्पन्न झाल्याने** आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी, वय ६० वर्ष, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि. हिंगोली, रा. माऊली नगर, गोरे ले–आउट, वाशिम जि. वाशिम यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई), १३ (२) अन्वये व दिनांक २६ जुलै २०१८ नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ ( सुधारणा कायदा २०१८) चे कलम १३ (१) (ब) सह कलम १३ (२) अन्वये गुन्हा केला असुन, त्यांची पत्नी सौ. रेखा मनोहर खिल्लारी यांनी आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी, यांनी प्राप्त केलेली अपसंपदा स्वतःच्या नावे बाळगुण गुन्हयास प्रोत्साहन दिले म्हणुन त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई), १३ (२), सहकलम १०९ भारतीय दंड सहीता अन्वये व दिनांक २६ जुलै २०१८ नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा कायदा २०१८) चे कलम १३ (१) (ब) सह कलम १३ (२) सहकलम १२ अन्वये गुन्हा केला आहे.

त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुरनं ८०४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई), १३ (२) अन्वये व दिनांक–२६ जुलै २०१८ नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ ( सुधारणा कायदा २०१८) चे कलम १३ (१) (ब) सह कलम १३ (२) अन्वये दिनांक २७.१०.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, श्री राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, पोह राजाराम फुपाटे, भगवान मंडलिक, गजानन पवार, पो.शि. पुंडगे, वाघ, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

**मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड,**
**मो.क्र. ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.**
**श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, मो.क्र. ९८२२२५९९३२.**
**टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.**
**व्हॉटसअप क्रमांक ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.**

28/10

( विकास घनवट )
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो. हिंगोली.

CS CamScanner